Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


## Peer-Reviewed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

October -2020

SPECIAL ISSUE NO - CCXLVII ( 247)

# Ideology of Mahatma Gandhi



Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Guest Editor
Dr. R.K.Ippar
Principal

Executive Editor
Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Executive Editor
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Executive Editor
Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's

Vaidyanath College Parli- Vaijnath, Dist. Beed.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

डा

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

October - 2020

ISSUE No - CCXLVII ( 247)

# Ideology of Mahatma Gandhi

Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director

Guest Editor
Dr. R.K.Ippar
Principal

Executive Editor
Dr. B.K. Shep,
Head, Dept. of History

Executive Editor
Dr. R.D. Rathod,
Head, Dept. of Sociology

Executive Editor
Prof.(Dr.) V.B. Gaikwad ,
P.G. Coordinator, Science

Jawahar Education Society's

Vaidyanath College Parli- Vaijnath,Dist. Beed.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmo S Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 41 | महात्मा गांधींचे स्त्रियांविषयीचा मानवतावादी दृष्टीकोन<br>डॉ. जयश्री महाजन /कांचन हिलाल देसले | 158 |
| 42 | महात्मा गांधी आणि अस्पृश्यता प्रा. कांबळे शिवरजी ईरबा | 162 |
| 43 | महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार डॉ. मा.धो.कच्छवे | 165 |
| 44 | Role Of Women In Mahatma Gandhi S Freedom Movement<br>डॉ. के.के. आहुजा | 168 |
| 45 | म. गांधी यांची सत्याग्रहाविषयी भूमिका प्रा. डॉ. गोविंद काळे | 170 |
| 46 | असहकार चळवळीत महात्मा गांधींची भूमिका<br>प्रा.डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ | 173 |
| 47 | गाँधी और मानव अधिकार डॉ. प्रिया सोनी खरे | 177 |
| 48 | महात्मा गांधीजींचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा.डॉ.काशिलिंग रघुनाथ गावडे | 179 |
| 49 | महात्मा गांधीजींची विचारधारा राहसे दिनेश टेट्या | 184 |
| 50 | महात्मा गांधीचे ग्रामोद्योगा विषयी विचार व कार्य<br>प्रा.डॉ. दीपक पां. लोणकर | 191 |
| 51 | गांधीजींचे जीवन शिक्षण प्रा. डॉ. भुजंग पाटील | 196 |
| 52 | गांधीजींचे शैक्षणिक धोरण प्रा. डॉ. भास्कर माने | 199 |
| 53 | महात्मा गांधी कालीन पत्रकारिता डॉ.भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी | 202 |
| 54 | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार प्रा.डॉ. बी. आर. शिंदे | 206 |
| 55 | महात्मा गांधींचे ग्रामस्वराज्या संदर्भातील विचार<br>डॉ.देवर्षा मुकंद अरविंद डॉ.बाळासाहेब वि.मुंडे | 209 |
| 56 | महात्मा गांधीजींची वर्धा शिक्षण योजना (१९३७) व शैक्षणिक राष्ट्रीय धोरण २०२० : एक अभ्यास श्री. अजितकुमार भिमराव पाटील | 212 |
| 57 | भगवद्गीता व महात्मा गांधी प्रा.डॉ.जाधवर बापू देवराव | 220 |
| 58 | ऑनलाइन शिक्षा वर्तमान संकट की वैकल्पिक व्यवस्था डॉ. रीना गुप्ता | 222 |
| 59 | महात्मा गांधींची आर्थिक विकेंद्रिकरणाची संकल्पना आणि आजची परिस्थिती कु. लीना ना. पुप्पलवार | 227 |



Late Ramesh Warpudkar (ACS) College Sonpeth Dist. Parbhani

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 247
ISSN : 2278-9308
October,2020

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

# महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार

प्रा.डॉ.मा.धो.कच्छवे
वाणिज्य विभाग प्रमुख सहयोगी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी

'तुम्ही मला कैद करु शकता
पण माझ्या मनाला
कैद करु शकत नाही'

- **महात्मा गांधी**

**प्रस्तावना (Introduction):**

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात मोहनदास करमचंद गांधी हे प्रमुख नेते होते. यांचा जन्म 2 ऑक्टोबर, 1869 रोजी पोरबंदर येथे झाला. 'महात्मा गांधी' या नावाने ते ओळखले जातात. त्यांनी अहिंसात्मक, असहकार आंदोलनांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. भारतातील लोक त्यांना 'बापू' म्हणत. 1944 मध्ये पहिल्यांदा सुभाषचंद्र बोस यांनी 'राष्ट्रपिता' संबोधले. गांधी सविनय सत्यागृहाच्या कल्पनेचे जनक होते. भारतात 2 ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस 'गांधी जयंती' म्हणून तर संपूर्ण जगात 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो. असहकार आणि अहिंसेच्या तत्वावर आधारित सत्यागृहाचा उपयोग गांधीजीनी प्रथम दक्षिण आफ्रिकेत तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. इ.सन 1915 मध्ये भारतात आल्यावर त्यांनी चंपारणमधील शेतकऱ्यांना जुलूमीकर व जमिनीदार यांच्याविरुध्द लढण्यासाठी एकत्र केले. 1921 मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रीयांचे समान हक्क, सर्वधर्म समभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे 'स्वराज्य' यासाठी संपूर्ण देशभरात चळवळ सुरु केली. 1930 मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे 400 कि.मी. लांब दांडी यात्रेचे प्रतिनिधीत्व केले. 1942 मध्ये त्यांनी इंग्रजाविरुध्द भारत छोडो आंदोलन सुरु केले. या सारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात तसेच दक्षिण आफ्रिकेत अनेकदा तुरुंगवास करावा लागला. गांधीनी आयुष्यभर 'सत्य' आणि 'अहिंसा' या तत्वांचा पुरस्कार केला. शालेय शिक्षण संपवून वयाच्या एकोविसाव्या वर्षी इ.सन. 1888 मध्ये ते इंग्लंडमध्ये लंडनला युनिर्व्हसिटी कॉलेज, विकीलीचे शिक्षण घेण्यासाठी गेले. तेथे त्यांनी इतर टेंपल या गावी राहून बॅरिस्टर होण्यासाठी भारतीय कायदा आणि न्यायशास्त्राचा अभ्यास केला. इंग्लंड मध्ये कायद्याचा अभ्यास करुन ते बॅरिस्टर बनले आणि भारतात परत आल्यानंतर वकिली करु लागले. गांधीजीनी आपल्या आयूष्याची 31 वर्षे दक्षिण आफ्रिकात घालवली. 1918 मध्ये चंपारन आणि खेडया मध्ये सत्याग्रहात त्यांना पाहिले. पहिले मोठे यश मिळाले. बिहारमधील जमिनदार स्थानीक शेतकऱ्यांना सर्वानी निळ उत्पादन करवयास लावायचे. त्यांना योग्य मोबदला मिळत नसल्यामुळे गरिबातच राहत. शेतकऱ्यांची गावे अत्यंत घाणेरडी आणि आरोग्याच्या दृष्टीने हानी कारक ठेवली जात होती. गांधीजीने तिथे एक आश्रम उभारुन सर्व लहान मोठया अनुष्यायांना एकत्र केले. गावाच्या स्वच्छतेचे तसेच शाळा, रुग्णालयाच्या बांधकामाचे काम हाती घेतले. पोलीसांनी अशांतता निर्माण करण्याच्या गुन्हयाखाली अटक केली. गांधीजीच्या सुटकेसाठी तुरुंगाबाहेर, पोलीस स्थानकाबाहेर, न्यायालयासमोर मोर्चे काढले. शेतकऱ्यांना जास्त मोबदला व आपल्या मतानुसार पीक घेण्याची मोकळीक मिळाली. गांधीजीनी असहकार, अहिंसा आणि शांततामय विरोध म्हणून शस्त्र वापरले.

**संशोधनाचा उद्देश- सदर शोध निबंध खालील उदेश निश्चीत करुन करण्यात आला आहे.**

1 . **गांधीजीची शिक्षणाविषयीची संकल्पना स्पष्ट करणे.**

2. **शिक्षणावर प्रकाश टाकणे.**

3. **निष्कर्ष काढणे.**

**अभ्यासपध्दती -**

**सदर शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. दुय्यम माहितीत दै.वर्तमानपत्रातील लेख, शोधनिंबध, संदर्भ ग्रंथ यांचा केले आहे.**

**संशोधनाची गृहितके -**

1. **महात्मा गांधीजीनी स्वदेशीचा स्वीकार केला.**

2.**शिक्षण हे सर्वांना मोफत मिळायला पाहिजे.**

- **शिक्षण क्षेत्रातील योगदान -**

'महात्मा गांधी' यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारत देशाला करीत असताना 'स्वदेशीचा स्वीकार' हा नारा त्यांनी सर्व भारतीयांना दिला. स्वत: स्वदेशी कपडे वापरायला सुरुवात केली. 23 ऑक्टोबर, 1937 मध्ये त्यांनी नविन शिक्षण पध्दतीचा विचार मांडला. मुलभुत शिक्षण खूप महत्वाचे आणि मूलवान् आहे. नविन प्रशिक्षनाची कल्पना हे त्यांचे भारतातील शेवटचे आणि सर्वोत्कृष्ट योगदान आहे. ग्रामिण भागाच्या सध्याच्या गरजा पाहता आणि ग्रामिण भागाच्या विकासाचे कार्यक्रम पाहता असे दिसते की, आज ग्रामीण भागाच्या विकासाचे कार्यक्रम पाहता असे दिसते की, आज ग्रामीण भागात सामाजिक सक्रियता कार्यक्रम आणि सामाजिक नेतृत्व आणि संस्थात्मक क्षमता बळकट करण्याची खूप गरज आहे. नवीन शिक्षण प्रणालीची धोरणे आखताना गांधीजीचे त्या वेळचे विचार नक्कीच उपयूक्त आहे.

गांधीजीना स्वयंभू शिक्षण विचार विकसित करायचा होता त्यासाठी त्यांनी 'नयी तालीम' ही संकल्पना मांडली. राष्ट्रीय शिक्षण विचार विकसित करताना त्यांनी भारतातील परिस्थिती इंग्रजाचे धोरण आणि भारतीय शिक्षण संस्थापुढील आव्हाने या सर्व बाबींचा विचार करुन नवा विचार विकसित केला. 'स्वावलंबन,' 'आत्मसन्मान' आणि 'श्रमप्रतिष्ठा' ही तीन मूल्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधी यांनी हिंद स्वराज्य या ग्रंथामध्ये आधुनिक भारताच्या नवनिर्मीतीचा विचार कृषी, उद्योग, आणि राष्ट्रजीवन यांना जोडणारा आहे. विद्यार्थ्यांस स्वावलंबी आणि आत्मनिर्भर करावयाचे होते. माणसाच्या बुध्दीमतेचा संपूर्ण विकास व्हावा, त्याच्या हाती निर्माणाचे सामर्थ्य यावे श्रमपृतिष्ठा प्राप्त व्हावी, त्यांचे अंतकरण स्वच्छ व्हावे, त्यांच्या हदयातून येणारा हुंकार आणि आतील आवाज हा त्याला स्वाभीमान आणि अस्मिता प्रदान करणरा असावा असे गांधीजींना वाटत होते. हाताने श्रमदान करावे मनाने समाजातील दुर्बलाचा विचार करावा आणि बुध्दीच्या विवेकाने संबंध राष्ट्रजीवन उजळवून टाकावे. अशा प्रकारचे स्वावलंबी शिक्षण गांधीजीना अपेक्षीत होते.

'शिक्षण' ही गुरु आणि शिष्य यांच्यातील आंतरक्रिया असते. गांधीजी शाळा आणि महाविद्यालये यांना ज्ञान मंदीरे मानत. ज्ञान गृहण करताना हया मंदीराचे पावित्र्य शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकावे पाळले पाहीजे. प्रत्येक व्यक्तीने आपले पावित्र्य जपाले पाहिजे. असा त्यांचा आगृह होता. देशात जन्मलेल्या प्रत्येक तरुणांने देशाच्या निर्मीतीत दर्जेदार ज्ञानकौशल्य विद्यार्थ्यांनी गृहण करावे. नैतिक मूल्यांची जपणूक करावी असे त्यांना वाटायचे. व्यक्तीचे शरीर, मन आणि आत्माच्या सर्वांगिण ज्यातून साधले जाते. त्याला शिक्षण म्हणतात.

प्राथमिक शिक्षणावर विशेष भर देताना गांधीजीनी शिक्षण हे सर्वांचे, मोफत व सार्वत्रित झाले पाहिजे तसेच बालकाला सुसंस्कारीत नागरिक घडविणारे शिक्षण असले पाहिजे. असा गांधीजीचा आगृह होता. ग्रामीण भागातील गरीब जनतेला शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी बिहार येथील चंपारण्य (1917) येथून ग्राम शिक्षणाची सुरुवात केली. शिक्षणाचे मूलभुत ध्येय म्हणजे बालकांचा सर्वांगिण विकास होय. विद्यार्थ्यांच्या शिक्षणातून शारीरिक विकासाकडे अधिक लक्ष केंद्रीय केले पाहिजे असा उपदेश करतात. बुध्दी, भावना, आणि हस्त याद्वारे ज्ञानात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक शिक्षण देण्यास यावे. आत्मविकासातून, आत्मसाक्षात्कार झाल्यास बालकांची आध्यात्मिक प्रगती करता येते. प्रत्यक्ष कृतीतून ज्ञान प्राप्त होते.

महात्मा गांधीनी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंत स्वातंत्र्याचे एक वातावरण तयार देशात तयार केले होते. शस्त्र न होता शांततामय मार्गाने आपल्या स्वातंत्र्याची मागणी रस्त्यावर येऊन अत्यंत शांततामय मार्गाने करायचे. सत्ताधिकाऱ्यांने लाठी मारली तर लाठी खायचे, गोळी मारली तर गोळी झेलायचे पण आपली मागणी ठामपणे मांडायचे. आपल्या कृतीतून महात्मा गांधीनी देशातील लोंकासमोर ठेवले. त्यामुळे संपूर्ण देशात अहिंसक तत्वज्ञानाचे पर्व सुरु झाले. गांधीजीना न भेटलेले, न पाहिलेले, त्यांचे भाषण न ऐकलेले देशातील कोटयावधी लोक बापू सांगतात म्हणून सत्याचे प्रयोग करीत राहीले. अहिंसेचे प्रयोग करीत राहिले. स्वातंत्र्यातून निर्माण झाले.

खादीचा वापर, स्वावलंबन, श्रमाची प्रतिष्ठा, अद्ययावत खेडयांची निर्मीती आणि सार्वजनिक जीवनातील चारित्र्य ही गांधी वादात सूत्री आहे. श्रमाशिवाय मिळवलेला पैसा झूठ आहे. हे सांगण्याचे धाडस गांधिविदात आहे. कोणतेही काम करायला लाज वाटायला नको हे गांधी विचारांच्या रुपाने जिवंत आहेत. महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता आजच्या काळात अजूनही टिकून आहे. महात्मा गांधी यांच्या विचारांनी जगभरातील अनेक नेते भारावून गेले. अहिंसा व सत्य या मूल्यांच्या मार्गाचे अनुकरण करत संघर्षात यशस्वी झाले.

स्वातंत्र्यपूर्व भारतात जी शिक्षण प्रणाली अस्तित्वात होती ती इंग्रजांनी उभारलेली होती ती इंग्रजांनी उभारलेली होती. या पध्दतीमुळे पाश्चिमात्य विचारांचा त्यांच्यावर प्रभाव पडत आहे. असे गांधीजीचे मत होते. शिक्षण पध्दतीमुळे भारतात शारिरिक श्रमाचे महत्व कमी होत आहे. शिक्षणाचे स्वरुप हे जनसामान्यांच्या संबंधित असावे पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवनिष्ठ ज्ञानावर त्यांचा अधिक भर होता. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांना सामाजिक सुधारणा घडवून आणायची होती. जनतेला स्वाभिमानाने जगायला शिकविणारे त्यांना माणूस बनविणारे, त्यांच्या पोटाला उद्योग देणारे, त्यांना चारित्र्यसंपन्न बनवून स्वराज्याला बळकट करणारे शिक्षण त्यांना हवे होते. कौशल्यावर आधारित व त्याच्या उपकरणांद्वारे शिक्षण देणे हा उद्देश होता. गांधीजीनी इ.सन 1927 ते 1930 या कालखंडांत शिक्षण संबंधी अत्यंत धाडसी काम सुरु केले होते. व्यक्तीच्या व समाजाच्या जीवनाला नवे वळण आणि नवी दिशा द्यावयाची असेल तर त्यात परिवर्तन नवे वळण आणि नवी दिशा द्यावयाची असेल तर त्यात परिवर्तन घडवायचे असल्यास शिक्षणाकडे फार बारकाईने लक्ष पुरविले पाहिजे. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे व नवनिर्मितीचे एक प्रभावी साधन आहे. असे त्यांना वाटायचे, शिक्षण हे प्रांतीय भाषेत दिले पाहिजे. स्वच्छ, हवा व शुध्द पाणी मिळेल अशी ठिकाणी असायाला पाहिजे.

- **निष्कर्ष**:-

गांधीजीची शिक्षणाची उदिष्टे बदलत्या काळानुसार बदलणारी आहेत. गांधीजीच्या दृष्टीने शिक्षणातून विद्यार्थ्यांत नागरीकत्व यावे, लोकशाही दृष्टीकोन निर्माण व्हावा, चारित्र्य संवर्धन व्हावे, सहिष्णुता, उद्योग प्रियता, स्वावलंबन इ.गुण यावेत हे शिक्षणाचे गुण असावेत असे गांधीजीचे मत होते.

गांधीजीने आपले संपूर्ण जीवन हे समाजासाठी अर्पण केले. अहिंसा, सत्य, ब्रम्हचर्य, शरीरश्रम, स्वदेशी अशा अनेक तत्वांनी आणि संस्कारांनी गांधीजीनी आपले सत्यागृही कार्यकर्ते घडविले. शिक्षण ही सातत्यपूर्ण रितीने चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणातून व्यक्तीचे शरीर, मन आणि आत्माच्या सर्वागिण विकास होतो. त्यामूळे मुलभुत शिक्षण दिले पाहिजे. त्यासाठी सुतारकाम, चप्पल बनविणे, बागकाम करणे. इत्यादी शिक्षण दिले पाहिजे. या शिक्षण पध्दतीमुळे विद्यार्थ्यांत श्रमप्रतिष्ठा, आत्मसन्मान, नैतिक मूल्ये, सामाजिक जाणिव आणि जबाबदारीची भावना वाढीस लागले.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. राजेश सावंत- गांधी विचार प्रहार अग्रलेख दि.30 जाने 2016
2. प्रा.डॉ.वि.ल.धारुरकर: गांधीजीचे शैक्षणिक विचार दै. पुढारी दि.2/10/2018
3. नामदेव मस्के- महात्मा गांधी यांचे शैक्षणिक क्षैत्रातील योगदान, जागृत महानराज्य दि.2/10/2019
4. डॉ. पी. आर थारकर: महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास, स्वा.रा.ती.म.वि.नांदेड पेज क्र.37
5. डॉ. रमेश बैनवाड: समकालीन भारतीय राजकारण : महात्मा गांधी आदित्य पब्लीकेशन्स, नांदेड .

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani